प्रेसनोट

दि. १०/०७/२०२१

**रोहन पंढरीनाथ खंडागळे, व्यवसाय नोकरी, सहायक पोलीस निरीक्षक व संपत नारायण पवार, पोलीस निरीक्षक दोघे नेमणुक सलगरवस्ती पोलीस ठाणे सोलापूर शहर यांच्यावर रु १,००,००००/- रु लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु ७,५०,०००/- रु ची लाच मागणी करुन ती स्विकारल्याने गुन्हा दाखल.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | फौजदार चावडी पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७ प्रमाणे |
| **आरोपीचे नांव व कार्यालय** | १) रोहन पंढरीनाथ खंडागळे, सहायक पोलीस निरीक्षक, सलगरवस्ती पोलीस ठाणे, सोलापूर शहर<br>२) संपत नारायण पवार, पोलीस निरीक्षक, सलगरवस्ती पोलीस ठाणे, सोलापूर शहर |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | रु १०,००,०००/- लाचेची मागणी करुन तडजोडी अंती रु ७,५०,०००/- लाचेची मागणी करुन सदरची रक्कम लोकसेवक दोन्ही लोकसेवक यांनी संगनमताने मागणी करुन यातील लोकसेवक खंडागळे यांनी सदरची रक्कम स्विकारली |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | रु ७,५०,०००/- |
| **थोडक्यात माहिती** | पडताळणी दि ०९/०७/२०२१<br>सापळा दि ०९/०७/२०२१<br>यातील तक्रारदार हे कॉन्ट्रॅक्टर असुन ते सोलापूर जिल्हयात ठिकठिकाणी छोटेमोठे रोडचे कॉन्ट्रॅक्ट घेत असतात. रोडचे कामाकरीता तक्रारदार यांचेकडे एकुण ०८ मोठे डंपर असुन तक्रारदार यांना डोणगांव परिसरात ०४ कि.मी. रस्त्यावर मुरुम भरण्याचे कॉन्ट्रॅक्ट दिले होते. दरम्यान यातील तक्रारदार यांनी परवानगीशिवाय शेतामधील मुरुम चोरुन नेले असलेबाबतच्या तक्रारीवरुन तक्रारदार यांचेविरुध्द सलगरवस्ती पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे गुन्हा दाखल झाला होता.<br>तक्रारदार यांचे विरुध्द दाखल गुन्हयाचा तपास यातील आरोपी सपोनि खंडागळे यांचेकडे होता. सदर दाखल गुन्हयात जप्त करण्यात आलेले तक्रारदार यांचे डंपर सोडविण्याकरीता तसेच तक्रारदार यांना अटक न करता गुन्हयाचे तपासात मदत करण्यासाठी यातील वरील नमुद दोन्ही लोकसेवक यांनी संगनमताने तक्रारदार यांचेकडे प्रथम १०,००,०००/- रु लाचेची मागणी करुन तडजोडी अंती रु ७,५०,०००/- लाचेची मागणी केली व सदरची लाच रक्कम यातील लोकसेवक सपोनि खंडागळे यांनी संभाजी महाराज पुतळा, पुणे नाका, सोलापूर येथे स्विकारली असता आरोपी खंडागळे यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तसेच आरोपी लोकसेवक पोलीस निरीक्षक पवार यांना चौकशी कामी ताब्यात घेवुन यातील दोन्ही आरोपी लोकसेवक यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. |
| **मार्गदर्शन अधिकारी** | श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधिक्षक, एसीबी पुणे<br>श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी पुणे<br>श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी, पुणे |
| **पर्यवेक्षण अधिकारी** | श्री. संजीव पाटील, पोलीस उपअधीक्षक, एसीबी, सोलापूर |
| **सापळा पथक** | श्रीमती. कविता मुसळे, पोलीस निरीक्षक, एसीबी सोलापूर यांचेसोबत पथकातील अंमलदार सपोफौ/ कोळी, पोह/ सोनवणे, पोह/ बाणेवाले, पोह/ चंगरपल्लु, मपोना/ स्वामी, पोना/ घुगे, पोना/ पकाले, पोशि/पवार, पोशि/साण्णके नेम. एसीबी सोलापूर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे सोलापूर जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.
**संपर्क पत्ता-** पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी रंगभवन चौक सोलापूर.

**संकेतस्थळ** - www.acbmaharashtra.gov.in
**ई मेल** - www.acbwebmail@mahapolice.gov.in
**ऑनलाईन तक्रार अॅप** – acbmaharashtra.net
**टोल फ्री क्रमांक-** १०६४
**दुरध्वनी क्रमांक-** ०२१७-२३१२६६८
**व्हॉटस अॅप क्रमांक** – ९९३०९९७७००

सहायक पोलीस आयुक्त/ पोलीस उप अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर.

( संजीव पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/ पोलीस उपअधीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो सोलापूर

Scanned with CamScanner